सकाळ

# विद्यापीठ अन् 'वैकुंठ मेहता' यांच्यात करार

**पुणे, ता. १२ :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकारी व्यवस्थापन संस्था यांच्यात सामंजस्य करार झाला आहे. या करारानुसार व्यवस्थापन क्षेत्रातील पदवी, पदविका आणि प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू करण्यात येईल. त्यातून व्यवस्थापन क्षेत्रातील नवोपक्रम, स्टार्टअप अशा अनेक संधी विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध होतील.या सामंजस्य करारावर नुकतीच स्वाक्षरी करण्यात आली.

यावेळी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, विद्यापीठाच्या 'इनोव्हेशन सेल'च्या संचालिका डॉ. अपूर्वा पालकर, व्यवस्थापन परिषद सदस्य प्रसेनजीत फडणवीस, वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकारी व्यवस्थापन संस्थेच्या संचालिका डॉ. हेमा यादव, कुलसचिव व्ही. सुधीर, ए. के. तिवारी आदी मान्यवर उपस्थित होते.

Pune, Pune-Today
13/02/2022 Page No. 1